महाराष्ट्र शासन

क्रमांक– पीसीआय १०८९/५८७३७/[३७८८]तांशि–१
शिक्षण व सेवायोजन विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई–४०० ०३२,
दिनांक ९ ऑक्टोबर, १९९१.

INSTITUTE OF PHARMACY (Degree Course) क्रमांक 04 Date 11-10-91 BORGAON (Meghe) Wardha.

प्रति,
अध्यक्ष / सचिव,
विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी, अमरावती,
पांडक बंगला, अमरावती [ कॅम्प ].

विषय– औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयास परवानगी.

महोदय,

उपरोक्त विषयासंदर्भात आपण शासनाकडे केलेल्या अर्जास व तंत्रशिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य यांच्याकडून प्राप्त झालेल्या सविस्तर प्रस्तावास अनुसरुन राज्यशासनाने आवश्यक तो शिफारस प्रस्ताव नोव्हेंबर, १९८९ मध्ये अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदे–कडे पाठविला होता. त्यावर आता अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने त्यांच्या क्रमांक – एफ. २७–२७/ ९१–एआयसीटीइ, दिनांक ७. १०. १९९१ अन्वये पूर्वमान्यता दिली असल्यामुळे शासन याद्वारे आपल्या संस्थेत " वर्धा " येथे १९९१–९२ या वर्षापासून औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रम विनाअनुदान तत्वावर ६० विद्यार्थी प्रवेशक्षमतेसह सुरु करण्यात खालील अटी व शर्तींवर परवानगी देत आहे :–

१] अभियांत्रिकी / तंत्रशास्त्र महाविद्यालये, विनाअनुदान तत्वावर सुरु करण्यास परवानगी देण्यासंदर्भात शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक – टीईएम ३३८२/ १११८३६/[१९०] /तांशि – १ अ, दिनांक २१. ५. १९८३ अन्वये तसेच शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक – पीसीआय ६०९१/[४५४१] / तांशि–१अ, दिनांक : १२. ८. १९९१ अन्वये [ दोन्ही शासन निर्णयांची प्रत सोबत जोडली आहे ] विहीत करण्यात आलेल्या अटी व शर्ती आपणास बंधनकारक असतील.

२] अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने त्यांच्या क्र. एफ. २७–२७/९१–एआयसीटीई, दिनांक ७. १०. १९९१ च्या मंजूरी पत्रामध्ये विहित केलेल्या अटी व शर्ती आपणास बंधनकारक असतील.

PRINCIPAL INSTITUTE OF PHARMACY (Degree Course) Borgaon (Meghe), Wardha

३] या संस्थेच्या संलग्निकरणासाठी आपणास नागपूर विद्यापीठाची मान्यता घ्यावी लागेल.

४] शासनाने विहित केलेल्या प्रवेश नियमानुसारच विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावा लागेल.

५] शासनाने विहित केलेल्या व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी मान्य असल्याबाबत आपणास करारनामा करावा लागेल.

२. आपणास विनंती करण्यात येते की, आवश्यक त्या औपचारिक बाबी पूर्ण करण्यासाठी आपण संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याशी त्वरित संपर्क साधावा. आपणास असेही सूचीत करण्यात येते की सर्व बाबींची पूर्तता केल्याशिवाय व नागपूर विद्यापीठाने लेखी स्वरूपात अंतिम परवानगी दिल्या-शिवाय अभ्यासक्रमास विद्यार्थ्यांना प्रवेश देऊ नये.

आपला विश्वास,

[signature]

[ गो. तु. धनमेहेर ]

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी :—

१] संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२] कुलसचिव, नागपूर विद्यापीठ, नागपूर.

३] कक्ष अधिकारी, कार्यासन विशि-२, शिक्षण व सेवायोजन विभाग.

प्रत माहितीसाठी :—

१] अतिरिक्त सचिव [ तांत्रिक ], अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, डी-४७, न्यु दिल्ली साऊथ एक्स्टेंशन, पार्ट-१, नवी दिल्ली-११००४९.

२] सहाय्यक शिक्षण सल्लागार [ तांत्रिक ], भारत शासन, मनुष्यबळ विकास मंत्रालय [ शिक्षण विभाग ], पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल अ‍ॅशुरन्स बिल्डींग, २ रा मजला, नरिमन रोड, मुंबई-२०.

३] सचिव, फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, १५, दीनदयाळ उपाध्याय मार्ग, नवी दिल्ली -११०००२.

INSTITUTE OF PHARMACEUTICAL EDUCATION AND RESEARCH
BORGAON (MEGHE), WARDHA

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मान्यतेनुसार राज्यात सुरु असलेल्या खाजगी विना अनुदानित औषधनिर्माणशास्त्र संस्थेत प्रवेशक्षमता बदल करण्यास, नवीन पदवी/पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास शासनाची मान्यता देण्याबाबत..

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्रशिक्षण विभाग,**
**शासन निर्णय** क्र संकिर्ण-२०१०/(१६५/२०१०)/तांशि-४,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२
दिनांक : ३० जून, २०१०.

संदर्भः- १) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी त्यांच्या संकेतस्थळावर प्रकाशित केलेली यादी .
२) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी सादर केलेले पत्र क्र. २/ एनजीसी/अभातंशिप-यादी/शा.मान्यता/२०१०/१२४१, दिनांक ३० जून, २०१०.

**शासन निर्णयः-** अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने त्यांच्या संकेतस्थळावर खाली नमूद केलेल्या औषधनिर्माणशास्त्र संस्थेत पदव्युत्तर पदवी एम. फार्मसी. (फार्मास्युटिकल केमिस्ट्री) व एम. फार्मसी (फार्मास्युटिक्स) या अभ्यासक्रमांच्या प्रवेशक्षमतेत वाढ करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यास अनुसरुन याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

| अ. क्र. | संस्थेचे नाव | अभ्यासक्रमाचे नाव | शै. व. २००९-१० ची प्रवेशक्षमता | शै. व. २०१०-११ ची प्रवेशक्षमता |
|---|---|---|---|---|
| १ | विदर्भ यूथ वेल्फेअर सोसायटीचे इन्स्टिटयूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अॅण्ड रिसर्च, बोरगांव (मेघे), वर्धा ४४२००१. | बी. फार्मसी | ६० | ६० |
| | | **एम. फार्म. (फार्मास्युटिकल केमिस्ट्री)** | १२ | १८ |
| | | **एम. फार्म. (फार्मास्युटिक्स)** | १५ | १८ |
| | | एम. फार्म (फार्माकोलाजी) | १० | १० |
| | | एम. फार्म (क्वालिटी अॅश्यूरन्स) | १५ | १५ |

INSTITUTE OF PHARMACEUTICAL EDUCATION AND RESEARCH
BORGAON (MEGHE) WARDHA

२. आता या शासन निर्णयाद्वारे उपरोक्त संस्थेस खालील अटी व शर्तीवर शैक्षणिक वर्ष २०१०-११ पासून संस्थेत उपरोक्तप्रमाणे पदव्युत्तर पदवी एम. फार्मसी. (फार्मास्युटिकल केमिस्ट्री) व एम. फार्मसी (फार्मास्युटिक्स) या अभ्यासक्रमांच्या प्रवेशक्षमतेत वाढ करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

१) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.

२) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक (तंत्रशिक्षण) यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.



प्राचार्य
औषध निर्माण शास्त्र शिक्षण व संशोधन संस्था, बोरगांव (मेघे), वर्धा

३) सदर अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणासाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ मधील तरतूदीनुसार संबधित विद्यापीठाची मान्यता/संलग्नीकरण घेणे आवश्यक आहे.

४) संबंधित संस्थेने संचालक (तंत्रशिक्षण) यांचेकडे आवश्यक ती संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

५) सदर पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार/पध्दतीनुसार करण्यात येतील.

६) शिक्षण शुल्क समितीने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ नुसार कारवाई करण्यात येईल.

७) रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

८) याशिवाय संचालक ( तंत्रशिक्षण), महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

(भ. सं. वानखेडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर
कुलसचिव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
संबंधित संस्था

<u>प्रत माहितीसाठी</u>

अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, ७वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली ११०००१

सहाय्यक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, दुसरा मजला, चर्चगेट, मुंबई

INSTITUTE OF PHARMACEUTICAL EDUCATION AND RESEARCH
BORGAON (MEGHE), WARDHA

C:\Documents and Settings\Administrator\My Documents\Lole\TE4\GR\intake variation.doc

प्राचार्य
औषध निर्माण शास्त्र शिक्षण व संशोधन संस्था, बोरगांव (मेघे), वर्धा

**शैक्षणिक वर्ष २०११-१२ पासून अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मान्यतेनुसार राज्यात सुरु असलेल्या खाजगी विना अनुदानित अभियांत्रिकी/ औषधनिर्माणशास्त्र/ एमबीए/एमसीए/पीजीडीएम महाविद्यालयांतर्गत नवीन पदवी/पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास तसेच प्रवेशक्षमतेत वाढ/घट करण्यास P.I.O./N.R.I./Foreign National/Foreign collaboration शासन मान्यता देण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०११/(२१३/२०११)/तांशि-४,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : ३० जून, २०११.

संदर्भ : १) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी त्यांच्या संकेतस्थळावर प्रकाशित केलेली यादी.
२) संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. २/एनजीसी/२०११/ ३२२५-अ, दिनांक ३० जून, २०११.
३) शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०११/(१९७/२०११)/तांशि-४, दि. ३० जून, २०११.
४) संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.
दिनांक ३० जून, २०११

<u>प्रस्तावना</u> : शैक्षणिक वर्ष २०११-१२ पासून अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने राज्यात सुरु असलेल्या खाजगी विना अनुदानित अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/एमबीए/एमसीए/पीजीडीएम महाविद्यालयांतर्गत नवीन पदवी/पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास तसेच प्रवेशक्षमतेत वाढ/घट करण्यास संचालक, तंत्रशिक्षण यांनी त्यांच्या दिनांक ३० जून, २०११ च्या पत्राद्वारे प्रस्तावित केल्याप्रमाणे संदर्भाधीन क्रमांक ३ च्या दिनांक ३०.६.२०११ च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिलेली आहे. परंतु सदर शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतर दिनांक ३०.६.२०११ च्या पत्रान्वये व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मान्यतेनुसार संचालनालयास काही त्रुटी आढळून आलेल्या आहेत. त्या त्रुटींचे निरसन करणे आवश्यक ठरले आहे. त्याप्रमाणे सदर पत्रान्वये संचालकांनी P.I.O./N.R.I./Foreign National/Foreign collaboration या संवर्गासाठी सन २०११-१२ ची अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने मान्यता दिलेल्या जागांच्या माहितीचा तक्ताही सादर केला आहे. तसेच सध्या अस्तित्वात असलेल्या संस्थांची प्रवेशक्षमता पुनर्स्थापित (Restored)/सुधारित करण्याबाबतची माहितीही संचालकांनी सादर केली

INSTITUTE OF PHARMACEUTICAL EDUCATION AND RESEARCH
BORGAON (MEGHE) WARDHA

आहे. त्यास अनुसरुन या प्रकरणी सर्वसमावेशक शासन आदेश निर्गमित करावयाची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** : अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने दिलेली मान्यता आणि संचालकांनी संदर्भाधीन क्रमांक ४ येथे सादर केलेल्या सुधारित प्रस्ताव विचारात घेता परिशिष्ट 'क' येथे दर्शविल्याप्रमाणे नवीन अभ्यासक्रम/प्रवेशक्षमतेत बदलास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. त्याचप्रमाणे परिशिष्ट 'ख' येथे दर्शविलेली सन २०११-१२ साठी P.I.O./N.R.I./Foreign National/Foreign collaboration साठीच्या प्रवेशक्षमतेस शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

३. तसेच काही संस्थांची प्रवेशक्षमता अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने पुनर्स्थापित केलेली आहे. त्यास परिशिष्ट 'ग' येथे दर्शविण्यात आले असून त्यासही शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

४. वरील परिच्छेद १, २ व ३ येथील मान्यता खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

i) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.

ii) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक (तंत्रशिक्षण) यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

iii) सदर अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणासाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ मधील तरतुदीनुसार संबंधित विद्यापीठाची मान्यता/संलग्नीकरण घेणे आवश्यक आहे.

INSTITUTE OF PHARMACEUTICAL EDUCATION AND RESEARCH
BORGAON (MEGHE), WARDHA

iv) संबंधित संस्थेने संचालक (तंत्रशिक्षण) यांचेकडे आवश्यक ती संचित ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

v) सदर पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार/पध्दतीनुसार करण्यात येतील.

vi) शिक्षण शुल्क समितीने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ नुसार कारवाई करण्यात येईल.

vii) संस्थेने त्यांच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे अंतिम वर्ष पूर्ण होण्यापूर्वी फार्मसी ॲक्ट, १९४८ च्या कलम १२ मधील तरतुदीनुसार फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांची विहित मान्यता प्राप्त

करुन घेणे बंधनकारक राहील.

viii) रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

ix) याशिवाय संचालक (तंत्रशिक्षण), महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

x) दुस-या पाळीसाठी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, महाराष्ट्र शासन व संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी विहित केलेल्या/करावयाच्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(भ. सं. वानखेडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, (संचालकांमार्फत).
कुलसचिव, संबंधित विद्यापीठ (संचालकांमार्फत).
संबंधित संस्था (संचालकांमार्फत)

INSTITUTE OF PHARMACEUTICAL EDUCATION AND RESEARCH
BORGAON (MEGHE), WARDHA

**<u>प्रत माहितीसाठी</u> :-**

अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, ७वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली ११०००१.

सहाय्यक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डिंग, दुसरा मजला, चर्चगेट, मुंबई.

निवडनस्ती/तांशि-४

# परिशिष्ट क

| Inst Code | Name of the Institute | Year of Est | Course Type Details | Course Type Name | Course Code | Course Name | Course Start Year | 2010-2011 | 2011-2012 | Variation |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4151 | Vidarbha Bahu-Uddeshiya Shikshan Sanstha's Tulshiramji Gaikwad Patil College of Engineering & Technology, Nagpur | 2007 | Bachelor of Engineering ( B. E. ) | Regular First Shift | 612 | Mechanical Engineering | 2011 | 0 | 60 | 60 |
| 4151 | Vidarbha Bahu-Uddeshiya Shikshan Sanstha's Tulshiramji Gaikwad Patil College of Engineering & Technology, Nagpur | 2007 | Master of Engineering ( M. E. ) | Regular First Shift | 242 | Computer Science and Engineering | 2011 | 0 | 18 | 18 |
| 4160 | Institute of Pharmaceutical Education and Research, Borgaon (Meghe), Wardha | 1991 | Master of Pharmacy | Regular First Shift | 126 | Quality Assurance Techniques | 1999 | 15 | 18 | 3 |
| 4160 | Institute of Pharmaceutical Education and Research, Borgaon (Meghe), Wardha | 1991 | Master of Pharmacy | Regular First Shift | 821 | Pharmacology | 2007 | 10 | 18 | 8 |
| 4163 | Rajiv Gandhi College of Engineering Research & Technology Chandrapur | 1983 | Bachelor of Engineering ( B. E. ) | Regular First Shift | 612 | Mechanical Engineering | 1983 | 60 | 120 | 60 |
| 4171 | Lokmanya Tilak Jankalyan Shikshan Sanstha's , Priyadarshini Institute of Engineering and Technology, Nagpur | 1999 | Bachelor of Engineering ( B. E. ) | Regular First Shift | 293 | Electrical Engineering | 2011 | 0 | 60 | 60 |
| 4171 | Lokmanya Tilak Jankalyan Shikshan Sanstha's , Priyadarshini Institute of Engineering and Technology, Nagpur | 1999 | Bachelor of Engineering ( B. E. ) | Regular First Shift | 612 | Mechanical Engineering | 2011 | 0 | 60 | 60 |
| 4171 | Lokmanya Tilak Jankalyan Shikshan Sanstha's , Priyadarshini Institute of Engineering and Technology, Nagpur | 1999 | Master of Engineering ( M. E. ) | Regular First Shift | 242 | Computer Science and Engineering | 2011 | 0 | 18 | 18 |
| 4172 | Anjuman College of Engineering & Technology, Nagpur | 1999 | Bachelor of Engineering ( B. E. ) | Regular First Shift | 372 | Electronics and Telecommunication Engg | 1999 | 90 | 120 | 30 |
| 4174 | ST. Vincent Pallotti College of Engineering & Technology, Nagpur | 2004 | Bachelor of Engineering ( B. E. ) | Regular First Shift | 372 | Electronics and Telecommunication Engg | 2004 | 60 | 120 | 60 |
| 4174 | ST. Vincent Pallotti College of Engineering & Technology, Nagpur | 2004 | Master of Engineering ( M. E. ) | Regular First Shift | 604 | CAD-CAM | 2011 | 0 | 18 | 18 |
| 4177 | Smt. Bhagwati Chaturvedi College of Engineering,Harpur Nagar, Nagpur | 2007 | Bachelor of Engineering ( B. E. ) | Regular First Shift | 612 | Mechanical Engineering | 2010 | 60 | 120 | 60 |
| 4177 | Smt. Bhagwati Chaturvedi College of Engineering,Harpur Nagar, Nagpur | 2007 | Master of Engineering ( M. E. ) | Regular First Shift | 242 | Computer Science and Engineering | 2011 | 0 | 18 | 18 |

INSTITUTE OF PHARMACEUTICAL EDUCATION AND RESEARCH
BORGAON (MEGHE), WARDHA